# पोलीस आयुक्त कार्यालय बृहन्मुंबई
# पोलीस शिपाई/पोलीस शिपाई चालक भरती २०१९
## -:प्रसिध्दपत्रक:-

मुबई पोलीस शिपाई/पोलीस शिपाई चालक भरती - २०१९ मधील पदांसाठी आवेदन सादर केलेल्या उमेदवारांना कळविण्यात येते की, दिनांक ०४/०८/२०२१ रोजी ह्या कार्यालयातर्फे शुध्दीपत्रक देण्यात आले आहे. त्यामध्ये उमेदवारांना त्यांच्या password व विकल्प निवडण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच Password सर्व उमेदवारांना बदलणे गरजेचे आहे. अन्यथा ते पुढील भरती प्रक्रियेत आपले आवेदनपत्र उघड शकणार नाही. तसेच एसईबीसी च्या उमेदवारांना **'अराखीव (खुला )'** **'OPEN'** किंवा **'आर्थिक दृष्टया दुर्बल'** **'EWS'** यापैकी एक विकल्प देणे गरजेचे आहे. परंतू काही उमेदवार त्यांचा Email ID विसरले आहेत किंवा अन्य कारणास्तव सध्या अस्तित्वात नाही/कार्यरत नाही. अशा प्रकारच्या तक्रारी काही उमेदवारांकडून या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत.

त्याअनुषंगाने पुन:श्च असे कळविण्यात येते की, ज्या उमेदवारांचे Email ID विसरलेले असतील/लक्षात नसतील किंवा अन्य कारणास्तव उपलब्ध होत नसतील तर, त्यांचा Email update करण्यासाठी तसेच विकल्प देण्यासाठी सर्व उमेदवारांना दिनांक २२/०८/२०२१ चे २४.०० वाजेपर्यंत मुदत वाढवून देण्यात येत आहे. उमेदवारांनी **www.mahapolice.gov.in** ह्या संकेतस्थळावर जाऊन **'पोलीस कॉर्नर' ह्या बटनला क्लीक करून 'पोलीस भरती - २०१९' येथे क्लीक करावे. तद्नंतर पोलीस आयुक्त बृहन्मुंबई शहर या घटकाच्या उपलब्ध लिंकवर जाऊन Email ID/ Password बदल करून विकल्प दयावा.**

पोलीस आयुक्त मुंबई

( गीता चव्हाण )
पोलीस उप आयुक्त,(मुख्यालय -२),
पोलीस आयुक्त कार्यालय बृहन्मुंबई.